MHAU120006882022

**फौ.कि.अर्ज क्र.– ११७/२०२२**
**कलम – भा.दं.वि. ४५७ अन्वये**

## <u>निशाणी – १ खाली आदेश</u>

**०१.** प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने कलम ४५७ फौजदारी प्रक्रिया संहितानुसार पोलीस स्टेशन सोयगांव येथील अपराध क्र.–१३२/२०२२, मधील जप्त रक्कम रुपये १८,२००/– असुन जप्त रक्कम सुपुर्त नाम्यावर मिळणेकरीता दाखल केला आहे.

**०२.** पुढे त्याने असे कथन केले आहे की, अर्जदाराकडे किराणा दुकान असुन तो यशदा महिला अर्बन निधी संस्थेचा पिग्मी एजंट आहे. त्याने दि. ०७.०८.२०२२ रोजी सदर संस्थेकरीता रुपये २१,०००/– जमा केले होते व त्याचप्रमाणे किराणा दुकानाच्या गल्ल्यामध्ये रुपये २,५००/– होते असे एकुण रुपये २३,५००/– त्याने किराणा दुकानाच्या गल्ल्यामध्ये ठेवले होते. दुस–या दिवशी सकाळी त्याला कळाले की, सदर रक्कम चोरीला गेली आहे म्हणुन त्याने पोलीस स्टेशन सोयगांव येथे रिपोर्ट दिला. पोलीसांनी आरोपीकडुन रुपये १८,२००/– जप्त केले आहेत. तो जप्त केलेल्या रकमेचा मालक व ताबेदार असुन ती रक्कम परत मिळावी अशी विनंती केली आहे.

**०३.** सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे म्हणणे **<u>नि.क्र.–०१</u>** वर दाखल केले असुन त्यामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, सदर रक्कम ही अभियोगपक्षाकरीता महत्वाचा पुरावा आहे. अर्जदाराने मालकीबददल कोणतेही दस्त सादर केले नाही. सदर रक्कम संपरिक्षेदरम्यान अभियोगपक्षाला आवश्यक आहे म्हणुन त्यांनी अर्ज नामंजुर व्हावा अशी विनंती केली आहे.

**०४.** तपास अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे **<u>नि.क्र.–०४</u>** वर दाखल केले. त्यामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, योग्य त्या अटी शर्तीवर रक्कम देण्यास त्यांची विनंती आहे.

**०५.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, अर्जदाराने वरील नमुद रक्कम रुपये २३,५००/– चोरीला गेल्याचा रिपोर्ट दिला होता. त्यापैकी रक्कम रुपये १८,२००/– आरोपीकडुन

हस्तगत करण्यात आली आहे. सदर रक्कम अभियोगपक्षासाठी महत्वाचा पुरावा जरी असला तरी सुध्दा सदर प्रकरणामधील संपरिक्षेकरीता बराच कालावधी लागु शकतो. त्यामुळे सदर रक्कम योग्य त्या अटी व शर्तीवर अर्जदाराला सुपुर्त नाम्यावर देणे योग्य होईल म्हणुन मी खालील आदेश पारित करीत आहे –

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात आला.

२. तपास अधिकारी यांना निर्देशित करण्यात येते की, पोलीस स्टेशन सोयगांव येथील अपराध क्र.–१३२/२०२२, मधील जप्त रक्कम रुपये १८,२००/– असुन त्यांनी अर्जदार यास रुपये १८,२०० च्या बंधपत्रावर सोडुन देण्यात यावे. सदर बंधपत्र हे रुपये ५००/– च्या स्टॅम्पवर असावे.

०३. तपास अधिकारी यांना असेही निर्देशित करण्यात येते की, त्यांनी सुपुर्तनामा दोषारोप पत्रासोबत न्यायालयात दाखल करावा.

Digitally signed by AMOL BHASKAR INGOLE
Date: 2022.11.08 10:26:55 +0530

[अमोल भा.इंगोले]
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
सोयगांव.

**दिनांक** – ०७.११.२०२२.

## **CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word, as per original Order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | K. P. Dusane. |
| Court | :- | C.J.J.D. & J.M.F.C., Soygaon. |
| Date | :- | 07.11.2022. |
| Order signed by presiding Officer on | :- | 07.11.2022. |
| Order uploaded on | :- | 08.11.2022. |